महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ९४ वे | दिनांक : २८/०३/२०२६ | वार : शनिवार

## आंबा-काजू उत्पादकांना २२ हजारांची मदत अपुरी ; शेतकऱ्यांची फसवणूक - भास्कर जाधवांची सरकारवर टीका



**मुंबई :** हवामानातील बदलामुळे कोकणातील आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असताना, राज्य सरकारने जाहीर केलेली हेक्टरी २२ हजार रुपयांची मदत म्हणजे बागायतदारांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार असल्याची घणाघाती टीका शिवसेना ठाकरे गटाचे नेते आमदार भास्कर जाधव यांनी केली आहे. नैसर्गिक संकटामुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ही तुटपुंजी मदत अपुरी असल्याचे सांगत जाधव यांनी संताप व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोकणातील आंबा बागायतदारांसाठी जाहीर केलेली हेक्टरी २२ हजार रुपयांची मदत अत्यंत तुटपुंजी असून, सरकारने या निर्णयाचा तातडीने फेरविचार करावा, अशी मागणी भास्कर जाधव यांनी केली आहे. कोकणाने तुम्हाला नेहमीच राजकीय पाठबळ दिले आहे, याची जाणीव ठेवा, असे सुनावत जाधव यांनी या मदतीचा तीव्र निषेध नोंदवला असून, सरकारविरोधात एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी आंबा बागायतदारांना केले आहे.

अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की, वातावरणातील बदलामुळे आंबा आणि काजूला कमी प्रमाणात फळधारणा झाली आहे. क्षेत्रीय पातळीवर झालेल्या नुकसानीचा अहवाल मागवला असून सकृतदर्शनी फळबागांचे नुकसान झाल्याचे आढळून आले आहे. कोकणात पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात १ लाख २४ हजार हेक्टर क्षेत्र आंबा लागवडीखाली आहे. तर काजू पिकाखाली १ लाख ७५ हजार १४० हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. मागील वेळी आपण आंबा आणि काजू उत्पादकांना १५ हजार हेक्टरी मदत दिली होती, यावेळी ती हेक्टरी २२ हजार रुपये केली आहे.

अंतिम आठवडा प्रस्तावाच्या उत्तरात देवेंद्र फडणवीस यांनी कोकणातील आंबा व काजू बागायतदारांसह धान उत्पादकांनाही बोनस देण्याची घोषणा केली असून, त्यासाठीची आवश्यक कार्यपद्धती सध्या निश्चित केली जात आहे. हवामानातील बदलामुळे कोकणातील आंबा आणि काजू पिकांचे अतोनात नुकसान होऊन शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

## चुकीने 'फोन पे'वर गेलेले ८० हजार परत ; हिंगोली सायबर सेलची तत्पर कारवाई यशस्वी

**हिंगोली :** आईच्या उपचारासाठी पाठवले जाणारे ८० हजार रुपये चुकून दुसऱ्या फोन पे वर गेल्यानंतर हिंगोलीच्या सायबर सेलने तातडीने कारवाई करत ८० हजार रुपये परत मिळवून दिली आहेत. अकोला जिल्ह्यातील जांब येथील अशोक सूर्यभान लठाड हे हिंगोली येथे कामाच्या निमित्ताने आले होते. त्यांनी त्यांच्या आईच्या उपचारांसाठी वर्धा येथे आपल्या भावाच्या फोन पे नंबर वर ८० हजार रुपये पाठवले. परंतु फोन पे मोबाईल नंबरचा एक नंबर चुकल्यामुळे सदरचे ८० हजार हे ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर परिसरातील एका महिलेच्या अकाउंट वर गेले. सदरची चूक कळल्यानंतर अशोक लठाड यांनी सदर महिलेशी संपर्क साधला. पण सदर महिलेने मोबाईल नंबर स्विच ऑफ करून कोणताही प्रतिसाद दिला नाही.

त्यानंतर अशोक लठाड यांनी सायबर सेल हिंगोली येथे येऊन घटनाक्रम सांगितला. त्यांची अडचण लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे जमादार प्रदीप झुंगरे, मारुती काकडे, दत्ता नागरे, प्रणिता मोरे यांनी तातडीने माहिती घेण्यास सुरुवात केली

या पथकाने सदर मोबाईलचे डिटेल्स घेतले असता सदरची महिलाही ठाणे जिल्ह्यातील कल्याण उल्हासनगर परिसरातील असल्याचे निष्पन्न झाले. सायबर सेल हिंगोलीने तत्काळ कल्याण तालुका पोलिस स्टेशन येथे संपर्क साधून सपोनि दत्तात्रय नलावडे कल्याण तालुका पोलीस स्टेशन यांच्यामार्फत उल्हासनगर येथील सदर महिलेचा पत्ता मिळवला. तसेच चुकून गेलेले ८० हजार रुपये तात्काळ परत करा, अन्यथा कायदेशीर गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्याबाबत बजावले. त्यानंतर सदर महिलेच्या नातेवाईकांनी तक्रारदार अशोक लठाड यांचे ८० हजार रुपये तात्काळ परत केले. त्यानंतर लठाड यांनी आईच्या उपचारासाठी पैसे भरले.

आईच्या हॉस्पिटलच्या कामासाठी पाठवलेले पैसे अचानक दुसऱ्या अकाउंट वर गेले व ज्यांच्या अकाउंट वर गेले त्यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अशोक लठाड यांच्यासमोर आईच्या उपचाराचा प्रश्न निर्माण झाला होता. परंतु सायबर सेलच्या मदतीने तक्रारदार यांचे पैसे तात्काळ परत मिळून दिल्याने तक्रारदार अशोक लठाड यांनी हिंगोली पोलिसांचे आभार मानले.

## दिव्यांग निधीची स्थापना; २० कोटींची तरतूद, हक्काधारित विकासाकडे महाराष्ट्राची वाटचाल



**मुंबई :** राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेत 'महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधी' स्थापन करण्यास मंजुरी दिली असून, या निधीसाठी प्रारंभी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निधीमुळे दिव्यांगांच्या हक्काधारित, सर्वसमावेशक आणि परिणामकारक सक्षमीकरणाला आर्थिक पाठबळ मिळणार असल्याचे दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ८८ नुसार स्थापन होणारा हा निधी दिव्यांगांच्या हक्काधारित सक्षमीकरणासाठी आर्थिक पाठबळ देणार आहे. राज्य शासनाने दिव्यांग कल्याण विभागाची पुनर्रचना करून त्याला 'दिव्यांग सक्षमीकरण विभाग' असे स्वरूप दिले असून, कल्याणकेंद्री दृष्टिकोनाऐवजी हक्काधारित व्यवस्थेकडे वाटचाल सुरू केली आहे.

राज्य निधीच्या माध्यमातून नियमित योजनांच्या चौकटीत न बसणारे किंवा निधीअभावी अपूर्ण राहिलेले उपक्रम राबविण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. पुनर्वसन, रोजगार व उपजीविका, कौशल्य विकास, शिक्षण, आरोग्य सेवा, सहाय्यक साधनांची उपलब्धता तसेच समुदायाधारित समावेशक विकास या क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

या निधीसाठी राज्य शासनाकडून २० कोटी रुपयांची प्रारंभिक तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय व्यावसायिक सामाजिक दायित्व (सीएसआर) देणग्या, अनुदान तसेच इतर विविध स्रोतांमधून प्राप्त होणारा निधीही या निधीत समाविष्ट केला जाणार आहे. विशेषतः सीएसआरच्या माध्यमातून अतिरिक्त निधी उभारण्यावर विभागाचा भर राहणार आहे.

निधीच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (दिव्यांग सक्षमीकरण) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळ स्थापन करण्यात आले आहे. या मंडळात वित्त व नियोजन विभागाचे वरिष्ठ अधिकारी सदस्य म्हणून कार्यरत राहतील, तर आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण हे सदस्य-सचिव म्हणून निधीचे कार्यभार पाहतील.

निधीच्या विनियोगासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समित्यांकडून प्रस्ताव प्राप्त केले जातील. हे प्रस्ताव आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण यांच्याकडे सादर होऊन त्यांची सखोल छाननी करण्यात येईल. त्यानंतर अभिप्राय व शिफारशींसह प्रस्ताव दिव्यांग सक्षमीकरण विभागामार्फत नियामक मंडळासमोर सादर केले जातील. नियामक मंडळाच्या मान्यतेनंतरच निधीचा अंतिम विनियोग करण्यात येणार असून, यामुळे निधीचा पारदर्शक, गरजाधारित आणि परिणामकारक वापर सुनिश्चित होणार आहे.

निधीच्या अंमलबजावणीसंदर्भात स्वतंत्र मार्गदर्शक सूचना लवकरच जारी करण्यात येणार आहेत. लाभार्थ्यांची पात्रता, आवश्यक कागदपत्रे तसेच निधी वितरणाची प्रक्रिया याबाबत स्पष्ट आणि सुस्पष्ट नियमावली निश्चित करण्यात येणार आहे


"सर्वसमावेशक महाराष्ट्र – सक्षम महाराष्ट्र" या संकल्पनेशी सुसंगत असलेला हा उपक्रम दिव्यांगांसाठी सामाजिक-आर्थिक समता, अडथळामुक्त पायाभूत सुविधा तसेच डेटा-आधारित धोरणनिर्मितीला चालना देणारा ठरणार आहे. हा निर्णय दिव्यांग सक्षमीकरणाच्या दिशेने उचललेले पाऊल असून, नियमित योजनांमधून वंचित राहणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना प्रभावी सहाय्य मिळवून देण्यात हा निधी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग सक्षमीकरण विभागाने निर्गमित केला असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २८ मार्च २०२६


## 'कॅमेऱ्यामागची ती' : महिला फोटोग्राफर्सच्या प्रेरक यशोगाथा






**नाशिक** : 'कॅमेऱ्यामागची ती ' या पुस्तकात लेखक प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार यांनी महाराष्ट्र आणि देशातील ४० महिला फोटोग्राफर्स यांच्या यशोगाथा शब्दांकित केल्या आहेत. पुस्तकात छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) च्या चार महिला फोटोग्राफर्स यांच्याही यश कथा समाविष्ट आहेत. यात नीलिमा पाका - टाक, स्वाती खेकाळे आणि देवळाणकर भगिनी यांचा समावेश आहे. कोल्हापूर येथील भाग्यश्री प्रकाशन यानी पुस्तक प्रकाशित केले आहे. डॉ. घोडेस्वार यांनी या आधीही विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवलेल्या स्त्रियांच्या योगदानावर प्रकाशझोत टाकणारी पुस्तके लिहिली आहेत. नीलिमा पाका - टाक ह्या मराठवाड्यातील पहिल्या छायाचित्र पत्रकार आहेत. स्वाती खेकाळे कुटुंबाचा परंपरागत फोटोग्राफी व्यवसाय प्रतिभा फोटो स्टुडीओच्या माध्यमातून सांभाळत आहेत. देवळाणकर भगिनी (चैताली प्रणाली) वेडिंग, फूड फोटोग्राफी अश्या विविध प्रकारच्या फोटोग्राफी क्षेत्रात कार्यरत आहेत. ''कॅमेरामन हा शब्द लिंगभेद करणारा आहे. त्या ऐवजी कॅमेरापर्सन हा शब्द उचित आहे. फोटोग्राफर म्हटला की आपल्या डोळ्यासमोर प्रामुख्याने पुरुषाची छबी उभी राहते. मात्र या क्षेत्रात होमी व्यारावाला यांच्यापासून आजच्या अनेक महिला फोटोग्राफर्स यांनी भरीव अशी कामगिरी केली आहे आणि करीत आहेत. त्यांच्या कार्याचा, त्यांनी केलेल्या संघर्षाचा परिचय वाचकांस करून देण्याच्या उद्देशाने हे पुस्तक लिहिले आहे. जेणेकरून नवीन मुलींना या क्षेत्रात येण्याची प्रेरणा मिळेल. शिवाय स्त्रीच्या नजरेतून व्यक्त होणारी फोटोग्राफी लोकांसमोर आणणे हा ही हेतू आहे.'' असे पुस्तकाचे लेखक प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार यांनी सांगीतले

## अय्युब पठाण यांना बालसाहित्य पुरस्कार प्रदान




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : पुणे येथील महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समितीच्यावतीने राम नवमीच्या शुभ मुहूर्तावर महाराष्ट्र राष्ट्रभाषा भाषा कार्यालय पुणे येथे २०२५ चा राज्यस्तरीय बालसाहित्य पुरस्कार बालभारतीच्या पाठयपुस्तकातील प्रसिद्ध कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या " अंगत पंगत " या बालकविता संग्रहाला ज्येष्ट बाल साहित्यिक महावीर जोंधळे आणि बालभारतीच्या किशोर मासिकचे संपादक किरण केंद्रे यांच्या हस्ते अय्युब पठाण यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर पुणे येथील साहित्य क्षेत्रातील नामवंत मान्यवरांची पुरस्कार वितरण सोहळ्याला विशेष उपस्थिती होती. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, आकर्षक स्मृतिचिन्ह, व सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे आहे. कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या साहित्य क्षेत्रात प्रसिध्द असलेला " अंगत पंगत " या बाल कवितासंग्रहाला हा सलग पाचवा राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेला आहे. लोहगावकर यांच्या या यशाबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

## प्रांताधिकारी गोविंद शिंदे एसीबीच्या जाळ्यात; २ लाखांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक




**पुणे** : जुन्नर-आंबेगाव विभागाचे उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) गोविंद पंढरीनाथ शिंदे यांना दोन लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) शुक्रवारी मंचर येथे रंगेहाथ पकडले. एका बांधकाम व्यावसायिकाकडून इमारत पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यासाठी त्यांनी ही लाच मागितली होती. मिळालेल्या माहितीनुसार, प्रांताधिकारी शिंदे यांनी एका इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधित बांधकाम व्यावसायिकाकडे तब्बल पाच लाख रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीअंती दोन लाख रुपये देण्याचे ठरले होते.

याबाबत ४८ वर्षीय तक्रारदार बांधकाम व्यावसायिकाने एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारदार हे एका भागीदारी फर्मचे भागीदार असून, त्यांच्या फर्मने पुणे-नाशिक महामार्गालगत नारायणगाव येथे एका प्लॉटवर इमारतीचे बांधकाम केले होते. इमारतीचे ९० टक्के काम पूर्ण झाल्यावर तक्रारदारांनी अंशतः पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे अर्ज केला होता. हा प्रस्ताव नगररचना विभागाकडे पाठवून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर प्रांताधिकारी शिंदे यांनी तो स्वतःकडे राखून ठेवला होता. तक्रारदार चौकशीसाठी गेले असता, शिंदे यांनी अंशतः पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी केली. त्यानंतर एसीबीने मंचर येथे सापळा रचला आणि गोविंद शिंदे यांना दोन लाख रुपये स्वीकारताना रंगेहाथ पकडले.

याप्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात प्रांताधिकारी गोविंद शिंदे यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी ही माहिती दिली.






## गरजू कुटुंबांना मिळणार हक्काचे घर

**मुंबई** : महाराष्ट्रातील गरीब आणि गरजू कुटुंबांना हक्काचे घर देण्यासाठी फडणवीस सरकारने एक ऐतिहासिक निर्णय घेतला असून, याअंतर्गत १ जानेवारी २०११ पर्यंत सरकारी जमिनीवर झालेली व सध्या अस्तित्वात असलेली अतिक्रमणे आता नियमानुकूल केली जाणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला.

तसेच यासाठीची पात्रता आणि अंमलबजावणीची कार्यपद्धतीही निश्चित करण्यात आली आहे. महसूल विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी केला असून, पात्र लाभार्थ्यांकडून ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत, ज्यामुळे हजारो कुटुंबांच्या डोक्यावर कायमस्वरूपी हक्काचे छप्पर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दरम्यान, वर्धा जिल्ह्यातील पुलगाव येथील हिंगणघाट फैल परिसरातील सुमारे ४,५०० कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला असून, येथील जुन्या सर्व्हे नंबर ३६९ मधील घरांना मालकी हक्क देण्याबाबत राज्य शासन सकारात्मक असल्याची ग्वाही मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली विधानसभेत दिली होती.

## जगण्याचे तंतर

गरीब श्रीमंतीचे अंतर
सतत वाढतच चालले
माणूस माणसाला सतत
पैशाच्या रूपात तोलले.....१

गरज पडता समाजात
पुढे गरीबच धावतो
श्रीमंत आनंदाने म्हणतो
गरीब देवासारखा पावतो...२

काय करावे या वृत्तीला
वेळेनुसार बदलत असते
सांगा राव तुम्हीच आता
तुम्हाला का बरं हे पटते.....३

आनंदात जाता विसरून
दु:खात करता आठवण
म्हणून म्हणतो माणसा
मानवतेचे कर साठवण.....४

समजून घ्यावे माणुसकीला
करू नये कधी भेदभाव
नित्य धर्मनिरपेक्ष राज्यात
ठेवावे सदा सर्वदा समभाव..५

नको पाळू जीवन जगताना
गरीब श्रीमंतीचे रे अंतर
आता शिकून घे रे माणसा
माणुसकीने जगण्याचे तंतर...६



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २८ मार्च २०२६


## पारंपारिक खेळ

शाळा आता सुटली
काढू थोडा वेळ
चला मित्रांनो खेळू
पारंपारिक खेळ

सायंकाळच्या वेळी
मैदानी थोडं पळू
कबड्डी व खो खो
आपसात आपण खेळू

पैज लावू आपण
नदीत पोहतांना
शिंपले गोळा करू
पाण्यात खेळतांना

दोरीवर उड्या मारू
रोज नित्यनेमाने
सुस्ती जाईल पळून
वाटेल ताजेतवाने

अबक, दुबक,तिबक म्हणून
विटी दांडू खेळू
डाव आला की कुणी
नका घराकडे पळू

शेतातील काळया मातीत
खेळू मग कुस्ती
सुर पारंब्या खेळतांना
करू धिंगा मस्ती

मोबाईलच्या विळख्यातून
बाहेर आपण पडू
मैदानी खेळाशी
कायम नातं जोडू



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## पानगळ

सुरु झाली पानगळ
चाहूल उन्हाची लागली
पानं हिरवी ती सारी
कशी गळून पडली

होती हिरवीगार वनराई
शोभे पानंफुलं झाडावरी
ऋतू लागता उन्हाळा
वाटे भकास डोंगरी

बदल नियम सृष्टीचा
दाना सुपात हसतो
अन् जाता तो जात्यात
पोट जगाचे भरतो

तसे गळली ही पाने
जाण्या मिळण्या मातीत
भेटे झाडाच्या मुळांना
आज होऊनी ती खत

आस ठेवून मनात
जन्म पुन्हा मी घेईन
ऊन वारा रे सोसून
जगा सावली देईन

**- ज्ञानेश्वर गायके, कन्नड**


# जयभवानीत लिंग समानता : महिलांचे कायदेशीर हक्क आणि पॉश कायदा-२०१३ या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा



**पाटोदा** : दिनांक २७ मार्च: पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या वतीने दि. २७ मार्च २०२६ रोजी 'लिंग समानता : महिलांचे कायदेशीर हक्क आणि पॉश कायदा-२०१३' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेचे उद्घाटन श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर गढी येथील प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते. तर प्रमुख पाहुण्या म्हणून पाटोदा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील अ‍ॅड.श्रीमती श्वेता किशोर राख आणि अ‍ॅड. श्रीमती दिपाली पांडव या उपस्थित होत्या. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक आणि कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या सत्काराने झाली. उद्घाटनपर भाषणात प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी महिलांचे हक्क, कायदे आणि समाजातील त्यांचे स्थान यावर भाष्य केले. महिलांनी आपल्या हक्कांविषयी जागरूक राहून आत्मविश्वासाने पुढे यावे, असे त्यांनी आवाहन केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या पिठासीन अधिकारी प्रा. ज्योती रकटे यांनी केले. त्यांनी लिंग समानता आणि महिलांचे कायदेशीर हक्क यांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास समाज अधिक सुरक्षित, समतोल आणि प्रगत होईल, असे स्पष्ट केले. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात अ‍ॅड.श्रीमती दिपाली पांडव यांनी 'लिंग समानता' या विषयावर सखोल मार्गदर्शन करत स्त्री-पुरुष समानतेचे महत्त्व अधोरेखित केले. महिलांचे सशक्तीकरण हे समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. द्वितीय सत्रात अ‍ॅड.श्रीमती श्वेता राख यांनी 'महिलांचे कायदेशीर हक्क तसेच पॉश कायदा-२०१३' विषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी कार्यस्थळी महिलांच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या कायदेशीर तरतुदी, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया आणि आंतरगत तक्रार समितीची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांनी कार्यशाळेतील विषयांचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी व महिलांनी कायद्यांची माहिती करून घेणे आणि त्यांचा योग्य वापर करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. वंदन जाधव यांनी मानले. या कार्यशाळेमुळे उपस्थितांना लिंग समानता, महिलांचे हक्क आणि कार्यस्थळी सुरक्षिततेविषयी उपयुक्त माहिती मिळाली. या कार्यशाळेला सर्व प्राध्यापक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता.

# 'शब्दालय' कडून ५ पुस्तके प्रकाशित



'शब्दालय प्रकाशना'कडे दोन चार वर्षांपासून माझी ५ पुस्तके प्रकाशनासाठी वेळोवेळी पाठवून ठेवली होती. पाठपुरावा करायला आवडत नसल्याने मधूनच केव्हातरी प्रगतीची विचारपूस करायचो. अचानक २ जानेवारी २०२६ ला सकाळी सुमतीताईंचा फोन आला, 'पुस्तके करायला घेत आहे.' मी म्हणालो, 'पुस्तके अजून अद्ययावत केली असल्याने आता पुन्हा ईमेल करतो, ती घ्या.' अद्ययावत पुस्तके त्वरीत ईमेल केली. मला वाटले दोनेक पुस्तके घेतील. पण पाचही पुस्तके फायनल तपासायला आली. तपासून दिली. आणि २६ मार्चला पाचही पुस्तके प्रकाशित झाली, म्हणून आश्चर्याचा सुखद धक्का बसला. १. 'भाषा अहिराणी' (भाषा), २. 'मानोसना शंभर वरीस' (अहिराणी लोककथा संपादन), ३. 'समीक्षा : साहित्य, कला आणि जीवन' (समीक्षा), ४. 'पाय नसलेली माणसं' (कवितासंग्रह), ५. 'पंख गळून गेले तरी' (आत्मचरित्र, दुसरी आवृत्ती) अशी ही पाच पुस्तके प्रकाशित झालीत. २०१४ साली पद्मगंधा प्रकाशनाने एकाच वेळी भाषा व लोकसंस्कृती विषयक माझी ४ पुस्तके प्रकाशित केली होती. आणि आता (२०२६) 'शब्दालय प्रकाशना'ने एकाच वेळी माझी ५ पुस्तके अतिशय मन लाऊन प्रकाशित केली. 'कला आणि संस्कृती : एक समन्वय' हे समीक्षेचे पुस्तक २००३ साली तर 'पंख गळून गेले तरी' हे आत्मकथन २००७ साली शब्दालयने प्रकाशित केले होते. मध्ये जवळ जवळ २५ वर्षे शब्दालय कडून माझी पुस्तके आली नाहीत. आणि आता ती कसर शब्दालयने भरून काढली. सुमतीताई लांडे, सुमीत लांडे, मृण्मयी लांडे आणि 'शब्दालय परिवार' यांचा खूप खूप आभारी आहे. पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी संपर्क : फोन : 9011201414 अथवा https://amzn.in/d/0ihPSnfR-

**- सुधीर रा. देवरे**





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002